महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८ / १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# गोड्या पाण्यातील मत्स्यपालन मार्गदर्शक सूचना

## प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून त्याचा भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अत्यल्प व अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेती क्षेत्रामध्ये संरक्षित सिंचनाकरिता शेततळ्यांची निर्मिती विविध योजनांच्या माध्यमातून केली जाते. उपलब्ध शेततळ्यांचा पिकांसाठी संरक्षित सिंचनाबरोबरच शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून गोड्या पाण्यातील मत्स्य शेती करण्यासाठी वापर केल्यास, शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. त्या अनुषंगाने जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत **“गोड्या पाण्यातील मत्स्यपालन”** हा घटक वैयक्तिक लाभाच्या घटकांमध्ये समाविष्ट केलेला आहे.

## उद्दिष्टे :

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. उपलब्ध नैसर्गिक साधनांचा प्रत्यक्ष उत्पादनासाठी कार्यक्षमपणे वापर करून मत्स्य शेती विकसित करणे व रोजगार वाढविणे.
३. संरक्षित सिंचनाबरोबरच जोडधंदा म्हणून गोड्या पाण्यातील मत्स्यशेती द्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे.

## लाभार्थी निवडीचे निकष :

१. प्रकल्पांतर्गत ५ हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांना अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.
२. ज्या शेतकऱ्यांकडे सामुदायिक शेततळे किंवा वैयक्तिक शेततळे आहे, अशा शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल.
३. इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना मत्स्यपालन या घटकाचा लाभ देय राहणार नाही.
४. शेतकऱ्यांकडे पाण्याचा साठा किमान आठ ते दहा महिने असणे आवश्यक आहे.

अर्थसहाय्य:

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या गोडया पाण्यातील मत्स्यपालन या घटकासाठी शेततळ्याच्या आकारमानानुसार अपेक्षित खर्च व अनुज्ञेय अनुदानाचा तपशील प्रपत्र-१ मध्ये देण्यात आला आहे. प्रकल्पांतर्गत देय अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे असेल-

| अ.क्र. | लाभार्थी | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकरी आणि महिला | आर्थिक मापदंडाच्या ६० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ६० टक्के यापैकी जे कमी असेल ते |
| २. | सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकरी | आर्थिक मापदंडाच्या ४० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ४० टक्के यापैकी जे कमी असेल ते |

## गोड्या पाण्यातील मत्स्यपालन हा घटक राबविण्यासाठी सर्वसाधारण सूचना -

१. गोड्या पाण्यात जलद वाढणाऱ्या माशांच्या जाती म्हणजे कटला, रोहू, मृगळ, चंदेरा, गवत्या आणि सायप्रीनस इ. जातींची पैदास करण्यात यावी.

२. मत्स्य पालनासाठी तलावातील पाण्याचा **आम्लता निर्देशांक ७ ते ८.५** या दरम्यान असल्यास मासे चांगले वाढतात. यासाठी आवश्यकता असल्यास चुना पाण्यात मिसळावा.

३. शेततळ्यातील **पाण्याचे तापमान २४ ते ३२ डिग्री सेल्सिअस** असल्यास माशांची वाढ उत्तम होते.

४. अस्तरीकरण विरहित शेततळ्यामध्ये पाण्याची नैसर्गिक उत्पादकता टिकविण्यासाठी सेंद्रिय खत म्हणून ताजे शेण टाकावे. नंतर युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर बोटूकली सोडावीत.

५. प्लास्टिक आच्छादन/अस्तरीकरण असलेल्या शेततळ्यात खताची मात्रा वापरण्यात येऊ नये. प्लास्टिक आच्छादन/अस्तरीकरण असल्याने नैसर्गिक खाद्य निर्मितीवर परिणाम होतो,त्यामुळे माशांच्या वाढीसाठी प्रथिन युक्त खाद्य देणे आवश्यक आहे .

६. शेततळ्यात मत्स्य संवर्धन करताना **५,००० ते १०,००० बोटूकली प्रती हेक्टर** या प्रमाणात संचयन केले जाते.

७. एकत्रित मत्स्य संवर्धनामध्ये रोहू, कटला, मृगळ या भारतीय प्रमुख कार्प बरोबरच चिनी कार्प (गवत्या व चंदेरा) आणि कॉमन कार्प (सायप्रिनस फिश) इ. माशांचे संवर्धन करता येते.

८. मत्स्य बीजाचे ८०% जीवीत प्रमाण गृहीत धरून त्याप्रमाणे बीज खरेदी करावे.

९. माशांना पूरक खाद्य म्हणून भाताचा कोंडा, शेंगदाणा पेंड,मक्याचा भरडा,सोयाबीन ढेप, गव्हाचा कोंडा यांचा वापर केला जातो.

१०. सुरुवातीच्या कालावधीमध्ये वाढ जास्त असल्याने माशांना जास्त प्रमाणात खाद्य पुरविणे आवश्यक असते. कालांतराने जसजशी वाढीचे प्रमाण कमी होत जाते त्याप्रमाणे खाद्याचे प्रमाण कमी केले जाते.

अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-

## लाभार्थी

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. मत्स्य संवर्धन करण्यासाठी शेतकऱ्यांकडे शेततळे व योग्य ते पाणी उपसा साधन (पंपसंच) असणे बंधनकारक आहे. **सदर घटकांतर्गत शेततळे किंवा पाणी उपसा साधन या बाबींकरिता अनुदान देय राहणार नाही.**

३. शेततळ्यातील माशांच्या वयोमानानुसार खाद्य व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे .

४. अस्तरीकरण केलेल्या शेततळ्यात मत्स्यपालन केल्यास तळ्यातील पाण्याचे गुणधर्म (तापमान, सामू इ.) सतत बदलत असल्याने शेततळ्यातील पाणी शेतीसाठी वापरून शेततळ्यात नवीन पाणी भरण्याची जबाबदारी संबधित लाभार्थ्याची राहील.

५. मत्स्य बीज खरेदी करताना लाभार्थ्यांनी नजीकच्या मत्स्य व्यवसाय विभागाच्या शासकीय मत्स्य बीज केंद्राकडून अथवा लाभार्थीच्या पसंतीनुसार त्यांचे जबाबदारीवर खाजगी मत्स्य बीज केंद्राकडून मत्स्य बीज खरेदी करावे.

६. शेततळ्यात मत्स्य संवर्धन केल्यावर उत्पादित माशांच्या विपणणाची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

७. लाभार्थ्यांनी पूर्वसंमती मिळालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सदर घटकाची अंमलबजावणी पूर्ण करून डीबीटी पोर्टलद्वारे अनुदान मागणी करणे बंधनकारक आहे ; अन्यथा देण्यात आलेली पूर्वसंमती रद्द करण्यात येईल.

८. ऑनलाईन अनुदान मागणी करताना लाभार्थ्याने मत्स्य बीज, खाद्य,खते व आवश्यक साहित्य यांची स्वसाक्षांकित केलेली मूळ खरेदी देयके अपलोड करावीत.

## ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

१. इच्छुक शेतक-यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छाननी समूह सहाय्यक व सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मदतीने करणे.

२. अर्जाच्या पात्रते/अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.

३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकाचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

## समूह सहाय्यक

१. इच्छुक शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.

२. शेतकऱ्यांचे ऑनलाईन नोंदणी अर्ज व शेतकऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करणे.

३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर बैठकीचे इतिवृत्त संकेतस्थळावर अपलोड करणे.

४. शेतक-यांच्या अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांना त्रुटी पूर्ततेसाठी मदत करणे.
५. शेतकऱ्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगणे.

## सहाय्यक कृषि अधिकारी

### अ. डेस्क -२

१. लाभार्थींचे ऑनलाईन अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छानणी आधारे नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन प्रकल्प स्थळ संबंधित घटकासाठी योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणे. तसेच सदर घटकाचा लाभ लाभार्थ्याने इतर शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.
३. डेस्क-२ वरती उपलब्ध करून दिलेला अहवाल आवश्यक खातरजमा करून भरण्यात यावा.
४. प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून फोटो अपलोड करावे.
५. डेस्क-२ वरील छानणी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास सदर अर्ज शिफारशीसह पूर्वसंमती साठी पुढील डेस्क वर पाठविणे.
६. अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास त्रुटी नमूद करून त्रुटी पूर्ततेसाठी मागील डेस्क वर परत पाठविणे.

### ब. डेस्क-४

१. लाभार्थ्याने अपलोड केलेली देयके व अनुषंगिक कागदपत्रांची छानणी करणे.
२. लाभार्थ्याने पूर्ण केलेल्या घटकाची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोका तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सुचनांमधील तांत्रिक मापदंडानुसार करण्यात आली आहे काय, याची खातरजमा करणे.
४. प्रकल्पाच्या DBT APP द्वारे लाभार्थी/लाभार्थी प्रतिनिधीसह पूर्ण झालेल्या घटकाचे फोटो अपलोड करावे.
५. विहित नमुन्यातील मोका तपासणी अहवाल अनुदानाची परिगणना करून तयार करणे.
६. प्रकल्पाच्या डीबीटी प्रणालीवरती मोका तपासणी अहवाल,देयकांची साक्षांकित प्रत ई. कागदपत्रे अपलोड करून प्रकरण पुढील डेस्क वर पाठविणे.
७. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून प्रकरण लाभार्थी स्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

## उप कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
३. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे, याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

## तालुका कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याचा प्राप्त अर्ज, अर्जासोबत अपलोड केलेली कागदपत्रे, ग्राम कृषि विकास समितीच्या बैठकीचे इतिवृत्त,डेस्क-२ वरील स्थळ पाहणी अहवाल व फोटो यांची छाननी करणे.
२. लाभार्थ्याने सदर घटकाचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याची खातरजमा करणे. त्यासाठी मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.
३. छाननी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास पूर्वसंमती प्रदान करणे.
४. छाननी अंती अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्रुटी नमूद करून डीबीटी प्रणालीद्वारे मागील डेस्क वर पाठविण्यात यावा.
५. लाभार्थी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र ठरत नसल्यास पूर्वसंमती नाकारण्यात यावी.
६. प्रकल्प संचालक, आत्मा व उपविभागीय कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.
७. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे काय, याची वेळोवेळी पडताळणी करणे. तसेच विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

## लेखाधिकारी

१. मोका तपासणी अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करणे.
२. मोका तपासणी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या अनुदान रकमेची पडताळणी करून योग्य असल्याबाबत खातरजमा करणे.
३. छाननी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीसाठी शिफारस करून पुढील डेस्क वर पाठविणे.
४. छाननी दरम्यान प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

## उपविभागीय कृषि अधिकारी

१. अनुदान प्रस्तावाची संपूर्ण छाननी करावी व शिफारशीत करण्यात आलेले अनुदान योग्य असलेबाबत पडताळणी करणे.
२. छाननी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीस अंतिम मान्यता देणे.
३. छाननी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.
४. लाभार्थ्यास अनुदानाची द्विरुक्ती टाळण्यासाठी वेळोवेळी मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.
५. प्रकल्प संचालक,आत्मा व तालुका कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.
६. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. तसेच विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
७. योजनेचे संनियंत्रण करणे.

## जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी:-

१. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मत्स्य विभागाशी समन्वय साधणे.
३. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
४. योजनेचे संनियंत्रण करणे.

## प्रकल्प संचालक, आत्मा

१. लाभार्थ्यांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रशिक्षण आयोजित करावे.
२. सदर प्रशिक्षणासाठी उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी समन्वय साधणे.

## विभागीय कृषि सहसंचालक:

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभागस्तरावर सदर घटक राबविलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

**क्षेत्रीय पर्यवेक्षीय तपासणी** - योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावरून पर्यवेक्षीय तपासणी करणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणात किमान तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी अधिकारी पदनाम | तपासणीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | उप कृषि अधिकारी | २५ % | |
| २ | मंडळ कृषि अधिकारी | १० % | |
| ३ | तालुका कृषि अधिकारी | ५ % | |
| ४ | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ % | |
| ५ | नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय | किमान २ प्रकरणे प्रति माह | |
| ६ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ७ | नोडल अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ८ | विभागीय कृषि सहसंचालक | किमान १ प्रकरण प्रति माह | |

## हमीपत्र
## गोड्या पाण्यातील मत्स्यपालन

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी "**गोड्या पाण्यातील मत्स्यपालन**" या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. गोड्या पाण्यातील मत्स्यपालन या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल, याची मला जाणीव आहे.
२. सदर घटकाचा लाभ मी अथवा माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून घेतलेला नाही.
३. सदर घटकांतर्गतची कामे मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.
४. सदर घटकांतर्गत प्रकल्पाने मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणकापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी स्वत: करील.
५. सदर व्यवसाय किमान ५ वर्षे करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
६. प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.
७. मी प्रकल्पाच्या अधिकारी/प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.
८. मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.
९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

## मोका तपासणी अहवाल
(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तालुका | |
| ४. | जिल्हा | |
| ५. | तपासणी दिनांक | |
| ६. | घटक | गोड्या पाण्यातील मत्स्यपालन |
| ७. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८. | प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नं./ गट क्र. | |
| ९. | शेततळ्याचे आकारमान | |
| १०. | शेततळ्यातील मत्स्यपालन करण्यासाठी आलेला खर्च रक्कम रु. | |
| ११. | पाणी उपसा साधन कार्यरत आहे किंवा नाही | होय/नाही. |
| १२. | अनुदानाची गणना: (अनुदान मर्यादा,देय अनुदान इत्यादि बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>एकूण खर्च रु. ----------------------<br>पूर्वसंमती नुसार मंजूर अनुदानाची रक्कम रु. ----------------------<br>मोका तपासणीनुसार देय होणारी रक्कम रु. ---------------------- | |

सदर घटकाची अंमलबजावणी लाभार्थ्याने मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली असल्याने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी
(श्री. )

सहाय्यक कृषि अधिकारी
(श्री. )
दिनांकित स्वाक्षरी

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री./श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री./श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री./श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | श्री./श्रीमती<br>सर्वे नं./गट न. _________<br>मु.पो. ___________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. _______ |
| ६. | बाब | **गोड्या पाण्यातील मत्स्यपालन** |
| ७. | शेततळ्याचे आकारमान | |
| ८. | शेततळ्यातील मत्स्यपालन करण्यासाठी आलेला खर्च रक्कम रु. | |
| ९. | तपासणी अधिकारी यांनी शिफारस केलेली अनुदानाची रक्कम रु. | |
| १०. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| ११. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १२. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |

| | |
|---|---|
| १४. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थी / लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव................................)

## प्रपत्र

## "नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई

## गोड्या पाण्यातील मत्स्य पालन शेततळ्याच्या आकारमानानुसार येणारा खर्च व अनुदान (रक्कम-रुपये)"

| अ. क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटर) | शेततळे प्रकार | क्षेत्र फळ (चौ. मी.) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | अ. यंत्र सामुग्री | | | ब. निविष्ठा, खते व खाद्य | | | | | | | | | | | एकूण खर्च रक्कम, रु. (अ+ब) | अनुज्ञेय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | फेक जाळे रु. | बर्डनेट (रु.१५/ चौ.मी.) | एकूण खर्च रक्कम, रु. | मत्स्य बोटूकली | | चुना | | युरिया | | शेणखत | | पूरक खाद्य | | एकूण खर्च रक्कम, रु. | | ६० % प्रमाणे | ४० % प्रमाणे |
| | | | | | | | | संख्या | रक्कम रु. (रु.३.०० प्रति नग) | किलो | रक्कम रु. २५/ किलो | किलो | रक्कम रु. ७ /किलो | किलो | रक्कम रु. ५ /किलो | किलो | रक्कम रु. ४३ /किलो | | | | |
| १ | १५ X १५ X ३ | अस्तरीकरणा सह | २२५ | ०.०२२५ | ३५०० | ३३७५ | **६८७५** | २०० | ६०० | ० | ०.०० | ० | ० | ० | ० | २१० | ९०३० | **९६३०** | **१६५०५** | ९९०३ | ६६०२ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ३३७५ | **६८७५** | २०० | ६०० | ४.५ | ११३.०० | ४.५ | ३१.५० | २२५ | ११२५ | २१० | ९०३० | **१०९००** | **१७७७५** | १०६६५ | ७११० |
| २ | २० X १५ X ३ | अस्तरीकरणा सह | ३०० | ०.०३ | ३५०० | ४५०० | **८०००** | ३०० | ९०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ३१५ | १३५४५ | **१४४४५** | **२२४४५** | १३४६७ | ८९७८ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ४५०० | **८०००** | ३०० | ९०० | ६ | १५०.०० | ६ | ४२.०० | ३०० | १५०० | ३१५ | १३५४५ | **१६१३७** | **२४१३७** | १४४८२ | ९६५५ |
| ३ | २० X २० X ३ | अस्तरीकरणा सह | ४०० | ०.०४ | ३५०० | ६००० | **९५००** | ४०० | १२०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ४२० | १८०६० | **१९२६०** | **२८७६०** | १७२५६ | ११५०४ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ६००० | **९५००** | ४०० | १२०० | ८ | २००.०० | ८ | ५६.०० | ४०० | २००० | ४२० | १८०६० | **२१५१६** | **३१०१६** | १८६१० | १२४०६ |
| ४ | २५ X २० X ३ | अस्तरीकरणा सह | ५०० | ०.०५ | ३५०० | ७५०० | **११०००** | ५०० | १५०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ५२५ | २२५७५ | **२४०७५** | **३५०७५** | २१०४५ | १४०३० |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ७५०० | **११०००** | ५०० | १५०० | १० | २५०.०० | १० | ७०.०० | ५०० | २५०० | ५२५ | २२५७५ | **२६८९५** | **३७८९५** | २२७३७ | १५१५८ |

संदर्भ: सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भुजल), आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. मत्स्य/ भु/०२१३०१/८६/२०२४/२७१, दि. १२/०८/२०२५

| अ. क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटर) | शेततळे प्रकार | क्षेत्र फळ (चौ. मी.) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | अ. यंत्र सामुग्री | | | ब. निविष्ठा, खते व खाद्य | | | | | | | | | | | एकूण खर्च रक्कम, रु. (अ+ब) | अनुज्ञेय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | फेक जाळे रु. | बर्डनेट (रु.१५/ चौ.मी.) | एकूण खर्च रक्कम, रु. | मत्स्य बोटूकली | | चुना | | युरिया | | शेणखत | | पूरक खाद्य | | एकूण खर्च रक्कम, रु. | | ६० % प्रमाणे | ४० % प्रमाणे |
| | | | | | | | | संख्या | रक्कम रु. (रु.३.०० प्रति नग) | किलो | रक्कम रु. २५/ किलो | किलो | रक्कम रु. ७ /किलो | किलो | रक्कम रु. ५ /किलो | किलो | रक्कम रु. ४३ /किलो | | | | |
| ५ | २५ X २५ X ३ | अस्तरीकरणा सह | ६२५ | ०.०६२५ | ३५०० | ९३७५ | **१२८७५** | ६०० | १८०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ६३० | २७०९० | **२८८९०** | **४१७६५** | २५०५९ | १६७०६ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ९३७५ | **१२८७५** | ६०० | १८०० | १२.५ | ३१३.०० | १२.५ | ८७.५० | ६२५ | ३१२५ | ६३० | २७०९० | **३२४१६** | **४५२९१** | २७१७४ | १८११६ |
| ६ | ३० X २५ X ३ | अस्तरीकरणा सह | ७५० | ०.०७५ | ३५०० | ११२५० | **१४७५०** | ७०० | २१०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ७३५ | ३१६०५ | **३३७०५** | **४८४५५** | २९०७३ | १९३८२ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ११२५० | **१४७५०** | ७०० | २१०० | १४ | ३५०.०० | १४ | ९८.०० | ७१० | ३५५० | ७३५ | ३१६०५ | **३७७०३** | **५२४५३** | ३१४७२ | २०९८१ |
| ७ | ३० X ३० X ३ | अस्तरीकरणा सह | ९०० | ०.०९ | ३५०० | १३५०० | **१७०००** | ८०० | २४०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ८४० | ३६१२० | **३८५२०** | **५५५२०** | ३३३१२ | २२२०८ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | १३५०० | **१७०००** | ८०० | २४०० | १८ | ४५०.०० | १८ | १२६.०० | ९०० | ४५०० | ८४० | ३६१२० | **४३५९६** | **६०५९६** | ३६३५८ | २४२३८ |
| ८ | २४ X २४ X ४ | अस्तरीकरणा सह | ५७६ | ०.०५७६ | ३५०० | ८६४० | **१२१४०** | ५०० | १५०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | ५२५ | २२५७५ | **२४०७५** | **३६२१५** | २१७२९ | १४४८६ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | ८६४० | **१२१४०** | ५०० | १५०० | ११.५२ | २८८.०० | ११.५२ | ८०.६४ | ५७६ | २८८० | ५२५ | २२५७५ | **२७३२४** | **३९४६४** | २३६७८ | १५७८५ |
| ९ | ३४X३४X ४.७ | अस्तरीकरणा सह | ११५ ६ | ०.११५६ | ३५०० | १७३४० | **२०८४०** | १००० | ३००० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ० | १०५० | ४५१५० | **४८१५०** | **६८९९०** | ४१३९४ | २७५९६ |
| | | अस्तरीकरणा शिवाय | | | ३५०० | १७३४० | **२०८४०** | १००० | ३००० | २३.१२ | ५७८.०० | २३. | १६१.०० | ११५६ | ५७८० | १०५० | ४५१५० | **५४६६९** | **७५५०९** | ४५३०५ | ३०२०४ |

संदर्भ: सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भुजल), आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. मत्स्य/ भु/०२१३०१/८६/२०२४/२७१, दि. १२/०८/२०२५